## घटक – २ - दक्षिण भारताचा प्रारंभिक इतिहास

गुरु २४ जून २०

**पार्श्वभूमी :-** भारतात उत्तर केंद्रीत इतिहास लिहिण्याची परंपरा फार मोठी आहे. त्यातुलनेत दक्षिणेकडील इतिहास लेखनाकडे थोडे दुर्लक्षच झाल्याचे आढळते. वास्तविक दक्षिणेकडील इतिहासाने ही भारताच्या वैभवशाली संस्कृतीच्या जडणघडणीत मोलाची भर घातली आहे. दक्षिणेकडील उदयन मोठी साम्राज्यांइतकाच महत्वाच्या राज्यांना विविधरंगी इतिहास या उत्तरेतील मोठ्या साम्राज्यांइतकाच महत्वाचा आहे. त्याचाही आपण सखोल अभ्यास केला पाहिजे. त्यादृष्टीने दक्षिण भारताचा प्रारंभिक इतिहास अभ्यासणे महत्वाचे आहे.

नर्मदा नदी व विंध्यपर्वताच्या दक्षिणेकडे असलेल्या आंध्रप्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, तेलंगणा व केरळ या पाच राज्यांना व लक्षद्वीप, पाँडेचेरी या केंद्रशासित प्रदेशांना मिळून दक्षिण भारत बनलेला आहे. पारंपरिक मान्यतेनुसार गुजरात व महाराष्ट्र ही राज्यही दक्षिण भारताचा भाग म्हणून गणली जातात. प्राचीन काळापासूनच या प्रदेशाला इतिहासाचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. पण तो दिर्घकाळ दुर्लक्षित राहिला होता. इ.स.पू. पाचव्या शतकापासूनच्या महापाषाण संस्कृतीचे पुरावे इथे सापडतात. इ.स.पू. चौथ्या शतकात ब्राह्मण, बौद्ध, जैन धर्मप्रसारकांमार्फत उत्तर भारतातील परंपरांचा प्रसार दक्षिण भारतात झाला. पुढे उत्तर आणि दक्षिण भारतीय परंपरांच्या संगमातून दक्षिणेत एक संमिश्र संस्कृती आकाराला आली. या संस्कृतीची जडणघडण साधारण इ.स.पू. दुसऱ्या शतकानंतर उदयास आलेल्या 'संगमयुगात' झाली. संगम युगालाच 'संगम साहित्याचा कालखंड' म्हणतात. या कालखंडात दक्षिणेत चेर, पांड्य, चोल हे तीन प्रमुख राजवंश होऊन गेले. या काळातील समाज, संस्कृती

आणि प्रारंभिक राजकीय व्यवस्था हा भाग आपण या प्रकरणाच्या पहिल्या भागात अभ्यासणार आहोत तर दुसऱ्या भागात या कालखंडातील अर्थव्यवस्था, शहरे व्यापार आणि हस्तकला या विविध घटकांचा अभ्यास करणार आहोत.

+ (अ) संगम साहित्याचा कालखंड :-

१) समाज २) संस्कृती ३) प्रारंभिक राजकीय व्यवस्था

* संगम साहित्य : (संगमयुग)

आर्यांच्या वेद वाङ्‌मयाच्या निर्मितीच्या कालखंडास आपण वैदिक संस्कृती किंवा आर्य संस्कृती म्हणतो तसेच संगम वाङ्‌मयाच्या निर्मितीच्या कालखंडास आपण 'संगम युग' म्हणतो. तमिळ कवींच्या गटाने (समुच्चयाने) एकत्र येऊन विविध काळात ज्या काव्य वाङ्‌मयांची रचना केली त्याला 'संगम साहित्य' असे म्हणतात. संगम म्हणजे संघ. अशा तीन संगमांचे आयोजन तीन ठिकाणी झाले होते. व त्यामध्ये विविध काव्य रचना करण्यात आल्या त्यातून आपल्याला दक्षिण भारताच्या प्रारंभिक इतिहासाची सर्वांगीण माहिती मिळते. पांड्य राजांच्या कालखंडात या संगमाचे आयोजन केले. विद्वान कवींच्या या तीन साहित्य सभा (कवीसंमेलने) मदुराई व कपाटपुरम या ठिकाणी आयोजित केल्या होत्या. या संगमात तमिळ भाषेतून मोठ्या प्रमाणात ग्रंथनिर्मिती झाली. इ.स.पू. ५०० ते इ.स. ५०० हा १००० वर्षांचा काळ संगम साहित्य निर्मितीचा कालखंड मानला जातो. पण या कालखंडाबाबत भरपूर मतभेद आहेत.

१) पहिला संगम :- तमिळ विद्वानांची पहिली विद्वानसभा मदुरेला भरली होती. त्यात ४५० कवींनी सहभाग घेतला होता अगस्तीऋषी या संगमाचे अध्यक्ष होते. त्यांना तमिळ साहित्याचे जनक मानले जाते. संगमईश व देवताही या संमेलनात सहभागी झाल्या होत्या. असे मानले जाते. या संगमात विपुल ग्रंथ लिहिले गेले. पण दुर्दैवाने त्यातील कोणतेच साहित्य आज अस्तित्वात नाही.

२) दुसरे संगम :- तमिळ कवींची दुसरी संगम 'कपाटपुरम' या ठिकाणी भरली. या मध्ये ५०० कवींनी सहभाग घेतला. या संगमात अनेक तमिळ ग्रंथांची निर्मिती झाली.

Scanned with CamScanner

पण त्या सर्वांमध्ये तोलकाप्पियर यांनी लिहिलेला 'तोलकाप्पियम' हा ग्रंथ फार महत्वाचा होता. हा तमिळ व्याकरण संबंधीचा अतिशय महत्वाचा ग्रंथ आहे. याच संगमात एट्टुतोगाई (आठ ग्रंथ) पत्तुपाट्टू (दहा कवितासंग्रह) हे ग्रंथ निर्माण झाले. तसेच 'शिलप्पादिकारम' व 'मणिमेखलाई' ही महाकाव्ये या काळात लिहिली गेली. आगस्तीयेच या संगमाचे अध्यक्ष होते.

③ तिसरे संगम :- तामिळ विद्वान कवींचे हे संमेलन मदुराई या ठिकाणी भरले. ४४९ कवींनी या संगमात साहित्य रचना केल्या. नक्कीरर या संगमाचे अध्यक्ष होते. या वेळी अनेक तामिळ ग्रंथ लिहिले गेले. त्यापैकी 'तिरुकुरळ' हा अतिशय महत्वाचा ग्रंथ या काळात लिहिला. राजशास्त्रावरील हा ग्रंथ तिरुवल्लुवर याने लिहिला. या ग्रंथाला दक्षिण भारताचे बायबल मानले जाते.

दक्षिण भारताच्या इतिहासात संगम साहित्य फार महत्वाचे आहे. तत्कालीन इतिहास समजून घेण्यासाठी या साहित्याचा फार उपयोग होतो. या संगमसाहित्याच्या कालखंडात दक्षिणेत चेर, पांड्य, चोळ, या वैभवशाली राजवटी होऊन गेल्या. त्यांचा संक्षिप्त आढावा घेणे महत्वाचे आहे.

*** संगमयुगातील दक्षिणेतील प्रमुख राजवटी :-**

१) चेर :- ~~भारतात~~ संगमयुगातील चेर ही एक महत्वाची सत्ता होती. इ.स.पू. दुसऱ्या शतकापासून इ.स.च्या बाराव्या शतकापर्यंत केरळ व त्याच्या आसपासच्या भूभागावर चेर आपले अस्तित्व टिकवून होते. 'वांची' ही चेरांची राजधानी होती.

चेरांच्या सुसंगत इतिहास फारसा ज्ञात नाही. चेर राजवंशात पेरूनार, पेरूमचेरल, उदीयनजेरल, कुट्टवन, सेंगगुवन, गजहस्ती आणि चेरमान पेरूमाळ हे राजे होऊन गेले. पैकी सेंगलुवन हा प्रसिद्ध सम्राट होऊन गेला. त्यालाच 'लालचेरा' असेही म्हणतात. त्याने सक्षम आरमार उभारणीकरून शत्रूंचा बंदोबस्त केला. तो पराक्रमी असुन विद्या व कलेचा आश्रयदाता होता. त्याने स्वतःला 'अधिराजर' असे बिरूद धारण केले होते. मलबार, त्रावणकोर, कोचीन, कोइमतूर या भागावर चेरांची सत्ता होती. चेरांचा पांड्य व चोल या सत्तांशी सतत संघर्ष होत होता. कालांतराने चेर सत्तेचा ऱ्हास झाला. 'धनुष्य' या राज्याचे प्रतिक होते.

② **पांड्य** :- भारतीय द्विपकल्पात सर्वात दक्षिण भागात आग्नेय दिशेला पांड्य राज्य होते. 'मदुराई' या राज्याची राजधानी होती. 'मासा' या राज्याचे प्रतिक चिन्ह होते. मोत्यांचा व्यापार या राज्याचे वैशिष्ट्ये होते. पांड्य वंशातील राजांची कारकीर्द व त्यांचा कालखंडही अस्पष्ट आहे. या राज्याला उदय इ.स.च्या दुसऱ्या शतकात झाला. संगम काळातील पांड्य राज्य हे संगम काळापुरतेच मर्यादित होते. नंतर सातव्या शतकात पुन्हा पांड्य सत्ता पुनरुज्जीवित झाले. पुढील काळात दक्षिणेत चालुक्य, पल्लव, पांड्य यांच्यात द्विपकल्पावरील प्रभुत्वासाठी संघर्ष झाला. संगमकाळातील पांड्य राज्य हे चेर व चोल यांच्या समकालीन होते. संगमयुगातील या तिन राजवंशामध्ये मदुराई राजधानी असलेले पांड्य राज्य महत्वपूर्ण होते. वेल्लार नदीच्या दक्षिणेस पादुकोटापासून केपकामोरीन पर्यंतच्या प्रदेशास पांड्य राज्य असे म्हणतात. नामिळ दंतकथेनुसार नेरियन हा त्यांचा पहिला राजा होय, तर इ.स. तिसऱ्या शतकात होऊन गेलेला 'नेडुनजेलीयन' हा पांड्यांच्या सर्वश्रेष्ठ संगमकालीन राजा होता. संगमसाहित्य प्रामुख्याने पांड्यांच्या राजाश्रयाखालीच विकसित झाले. थोडक्यात पांड्य हा संगमकालीन प्रभावी राजवंश होता.

③ **चोल** :- संगमयुगातील चोल हा तिसरा महत्वाचा राजवंश इ.स.पू दुसऱ्या शतकात उदयास आला. उरय्यूर ही चोलांची राजधानी होती. दक्षिण भारताच्या इतिहासाबर दिर्घ चोल, चेर, पांड्य या घराण्यांनी दक्षिण भारतात दिर्घ काळ आपला प्रभाव निर्माण केला. चोल राजवंश केवळ दक्षिणेच्यात

संपूर्ण हिंदुस्थानच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. एक प्रबळ आरमारी सामर्थ्य असणारे उत्कृष्ट प्रशासन यंत्रणा असलेले व कला साहित्याच्या क्षेत्रात मौलिक ठसा उमटविणारे चोळ साम्राज्य विशेष महत्वाचे आहे. चोळांचीही प्रारंभिक चोळसत्ता व उत्तरचोळसत्ता अशी दोन वेगवेगळी साम्राज्य दोन कालावधीत होऊन गेली. प्रारंभिक चोळ राजवट ही संगम युगात होऊन गेलेली राजवट होती. पुहार किंवा कावेरीपट्टणम ही या राज्याची राजधानी होती. कारीकाल हा प्रारंभिक चोळसत्तेचा संस्थापक होता. 'वाघ' या राज्याचे प्रतिक होते.

संगमयुगीन दक्षिण भारतातील चेर, पांड्य, चोळ या प्रादेशिक राज्यांनी दक्षिण भारतच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक तसेच आर्थिक क्षेत्रात अतिशय मोलाची भर घातली. त्याचाही अभ्यास करणे महत्वाचे आहे.

(२५ जून २०२०) गुरुवार

## ⓑ संगमयुगीन - समाज जीवन :-

तोलकापियम, एत्तुतोगाई, पत्तुपाट्टू, पांडेनकीळकणक्कु, शिलप्पादिकारम, मणिमेखलाई, शिवाग सिंदामणी, वळायापथी, कुंडलकेसी, व तिरुकुरळ या संगमकालीन तमिळ ग्रंथाच्या आधारे आपल्याला तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक जीवनाच्या अभ्यास करता येतो. संगमकालीन समाजजीवनाचे स्वतःचे वेगळेपण पाहायला मिळते. उत्तरभारताच्या तुलनेत तत्कालीन दक्षिण भारतीय समाज जीवन वैशिष्ट्यपूर्ण होते.

१) पाचसमाज गट (पाचतिनई) :- संगमयुगीन समाज पाच प्रादेशिक विभागात विभागलेला दिसतो. ही विभागणी विशिष्ट पर्यावरण, त्यांच्या व्यवसायाचे स्वरूप, त्यांचे भौगोलिक वातावरण, त्यांचे सामाजिक वैशिष्ट्ये, त्यांचे राहणीमान, सवयी, श्रद्धा, चालीरिती रूढीपरंपरा या विविध घटकांवर केलेली आहे. या प्रत्येक समाजगट स्वतःची स्वतंत्र ओळख जपणारा होता. 'हे पाचतिनई (विभाग) (अ) कुरुंजी (ब) मुलई (क) मरुदम (ड) नईदल (इ) पालई या नावाने ओळखले जात होते.

(अ) कुरुंजी :- हा पहाडी समाज होता. जंगल तोडून शेती करणारा हा समाज होता. शिकार करणे, स्थलांतरित शेती करणे व मध जमा करणे हा यांचा व्यवसाय होता.

(ब) मुलई :- हा जंगल विभागात वास्तव्य करणारा व निश्चित शेती करणारा वर्ग होता. हा सुद्धा स्थलांतरित शेती करणारा वर्ग होता. पशुपालन हा देखील त्यांचा व्यवसाय होता.

(क) मरुदम - हा सुपिक शेती करणाऱ्यांचा वर्ग होता. यांना उल्वर व वेल्लुवर असेही म्हणतात. शेतीची मशागत करून शेती करणारा हा तिनई (गट) होता.

(ड) नईदल — हा समुद्र किनारपट्टीवर राहणारा समाज होता. मासेमारी हा यांचा प्रमुख व्यवसाय होता. परतावार, वेलायनार असे यांचे दोन गट होते.

(इ) पालई — वालुकामय पठारी कुरणांच्या विभागात वास्तव्य करणारा हा तिनई होता. युद्धकलेत प्रवीण असणारा हा वर्ग होता. दरोडा, युद्ध व पशुधनाचे टोळ्यांपासून रक्षण हे यांचे काम होते.

(२) चारस्तरीय समाज :- संगमकालीन समाज चार स्तरात विभागात दिसतो. उत्तरेकडील चातुर्वर्ण्य व्यवस्थेचा प्रभाव या विभागणीवर होता. तरीही वर्णानुसार काटेकोर विभागणी येथे दिसत नाही. संगमकालीन समाजाचे चार स्तर - (अ) आंदनर (ब) आरासर (क) वणिकर (ड) वेल्लार असे होते.

(अ) आंदनर (ब्राह्मण) :- दक्षिणेतील संगमकालीन ब्राह्मण समाज होय. ब्राह्मण संगमकाळात तमिळ प्रदेशात आले. राजाश्रय मिळाल्याने हा वर्ग कवी, भाट, धर्मगुरू अशी कामे करत असे. धर्मकार्य त्यांची प्रमुख जबाबदारी होती.

(ब) आरासर (क्षत्रिय) :- हा क्षत्रियांचा वर्ग होता. संगमकालीन योद्धावर्ग यामध्ये येत होता. संगमकाळात राजमंडळी, राज्यकर्ता वर्ग हा क्षात्रीय गटात गणला जात होता. युद्ध व संरक्षण त्यांची जबाबदारी होती.

(क) वणिकर (वैश्य) :- समाजाचा तिसरा स्तर म्हणजे वणिकर म्हणजेच वैश्य होय. संगमसाहित्यात क्षत्रिय व वैश्य यांचा नियामक वर्ग म्हणून उल्लेख केलेला आढळतो. मसाल्याचे पदार्थ, हिरे मोती, पाचू यांचा मोठ्या प्रमाणातील

Scanned with CamScanner

व्यापार यामुळे वैश्य वर्ग भरभराटीला आलेला होता.

(३) वेल्लालर (शेतकरी) :- हा चौथ्या स्तरावरील वर्ग जमिनीची मालकी असणारा व शेती करणारा हा वर्ग होता. आरासर वर्ग वेल्लालर वर्गाशी सोयरीक करत असे. यावरून त्यांचे महत्व लक्षात येते. यातही श्रीमंत शेतकरी व गरीब शेतकरी अशी वर्गवारी होती.

(२) जातिव्यवस्था :- तोलकाप्पियम ग्रंथात वरिष्ठ व कनिष्ठ वर्ग असे उल्लेख येतात. त्यानुसार संगम काळात जातिव्यवस्था प्रचलित होती असे लक्षात येते. इलिसियन, तसेच उयत्तोर अथवा मेल्लोर वरिष्ठ होते. तर किल्लोर हे कनिष्ठ होते. हुशार तुरियन व पराइयास हे देखील निम्नकुलीन समजले जात होते. परिमार व जनावरांची व देखील शेती करणारा खालच्या वर्ग मानला जातो. परिमार हा कमविणारा व शेतमजुरीची कामे करणारा वर्ग निम्नस्तरीय मानला होता. अनेक जाती जमाती या काळात दिसत असल्या तरी नंतरच्या काळात उत्तर भारतात यापैकी मिळत नाही, व दक्षिणेकडे प्रसार जाती भेदाचा असलेला प्रभाव या काळात पाहायला मिळत नाही. संदर्भाशी तमिळ वाङ्मयात आढळतात. परतीयर हा देखील समाजातील महत्वाचा वर्ग होता. अस्पृश्य गणल्याचे संदर्भही तमिळ वाङ्मयात आढळतात.

दि. २६ जून २०२०

(४) गुलामगिरी :- गुलामगिरी हा जगातही समाजावरील एक कलंक होता. सामाजिक जीवनातील गुलामगिरी प्रथा काही प्रमाणात होती. गुलाम बाळगण्याचा प्रकार प्रचलित होता. श्रीमंत लोक, जमीनदार लोक घरी गुलाम ठेवत होते. गुलाम दोन प्रकारच्या कामासाठी ठेवले जात होते. एक शेतीच्या कामासाठी व दुसरे घरगुती व सार्वजनिक कामासाठी गुलामांना राबविले जात होते.

(५) स्त्रीजीवन :- चेर, पांड्य, चोळ या संगमकालीन राजवटीत समाज जीवनात स्त्रियांना महत्वाचे स्थान होते. तसेच तिच्या पातिव्रत्याची प्रशंसा केली आहे. समाजात मुलगी, माता, पत्नी या सर्व जबाबदाऱ्या ती समर्थपणे पेलत होती. युद्धांच्या प्रसंगात स्त्रिया सहभागी होत्या. कला, साहित्य

नृत्य, संगीत, नाटक या सर्वच क्षेत्रात स्त्रियांनी आपला ठसा उमटविला होता. पुरुषांच्या तुलनेत त्यांना वेगळ्या प्रकारचे शिक्षण दिले जात होते. संगम साहित्याच्या निर्मितीही साधारण पन्नास विद्वान स्त्रियांचा सहभाग होता. स्त्रीयांना सामाजिक व आर्थिक दर्जाही चांगला होता! 'कुरुंथपदीनिमम' व 'सिरु-कुरुंथदीनिमम या ग्रंथांची रचना 'कुरुंथदीनियर' या स्त्रीनी आहे. अव्वयार, नत्रचैल्लैयार या येथील प्रसिद्ध कवयित्री होत्या. स्त्रीयांसाठी शिक्षण सर्वांसाठी होते. तत्कालीन समाजात स्त्रीयांवर काही प्रमाणात ~~बंधने~~ बंधने असली तरी मोठ्या प्रमाणात स्त्रीयांना सन्मानाचे स्थान होते. सर्वक्षेत्रात स्त्रियांना सहभाग प्रभावी होता.

संगमकालीन समाजजीवनाला आढावा घेतल्यानंतर या समाजाच्या विविध रंगी स्वरुपाची आपल्याला कल्पना येते. समाजाची विविध गटात विभागणी झालेली होती या काळात तरी उत्तरेतील समाजात दिसणारी स्पष्ट वर्णवारी व ताठरता संगम युगीन समाजात दिसत नाही.

(२) संगमयुग - सांस्कृतिक जीवन :- दक्षिणेच्या सांस्कृतिक विकासात संगमयुगाने विशेष योगदान दिले आहे. दक्षिण भारतात चेर, पांड्य, चोल अशा अनेक लहान लहान राजवटी होऊन गेल्या त्यांच्यातील सत्तेच्या सत्तासंघर्षामुळे दक्षिणेत कमी-अधिक प्रमाणात युद्धमान स्थिती राहिली होती. पण त्याचा दक्षिणेच्या सांस्कृतिक विकासावर दुष्परिणाम झाला नाही. उलट संस्कृतीच्या विविधांगाची या काळात भरभराट झाल्याचे दिसते. या संगमयुगीन संस्कृतीचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

(अ) सण-उत्सव :- संगमकालीन समाजातील सण-उत्सव परंपरा सार्वत्रिकता, समता, साधर्म्य होते. लोक एकत्र येऊन आनंदाने हे सण उत्सव साजरे करत असत. येणाऱ्या अतिथींची मुक्त मनाने सरबराई करणे हे त्यांचे खास वैशिष्ट्य होते ओनम, पोंगल, कार्तिगय, थैनिरडाल व पंगुनिविलू या लोकप्रिय उत्सवाचे मोठ्या प्रमाणात आयोजन केले जाते. उत्सवाच्या काळात वडिधाऱ्या व विद्वान लोकांच्या सन्मान केला जात असे. तसेच प्रत्येक उत्सव समारंभावेळी मोठ्या प्रमाणात दिव्यांचीरोषणाई केली जात असे. त्यालाच 'विलक्केरल' असे म्हणतात थोडक्यात दक्षिणेच्या सांस्कृतिक जीवनात हे सर्व सणसंमारंभ महत्त्वाचे होते.

(ब) कौटुंबिक समारंभ :- कुटुंब हा समाज-जीवनाच्या मुळाधार होता. अनेक कुटुंबाचे मिळून उर म्हणजेच गाव बनत असे. गावांनी

स्वत:ची आपली वेगळी संस्कृती होती. त्यावेळ्या सर्वसाधारण चालीरिती परंपरा होत्या. विविध कौटुंबिक समारंभ साजरे केले जात होते.

(क) कला स्थापत्य :- संगमकाळात कला व स्थापत्याची भरभराट झाल्याचे दिसते. दक्षिणेतील बहुतेक राज्यकर्ते हिंदुधर्माभिमानी होते त्यामुळे त्यांनी आपल्या देवदेवतांची सुंदर मंदिरे बांधली. मदुरा, रामेश्वर, महाबलीपुरम, कांची, तंजावर, तिरुपती अशा अनेक नगरात भव्य मंदिरे निर्माण केली. अत्यंत कलात्मक, सौलीदार, सुंदर शिल्पकला व स्थापत्य या दृष्टीने ही सर्व मंदिरे उल्लेखनीय आहेत. या काळातील मंदिरांची रचना ही प्रामुख्याने स्थापत्य शिल्पानेच केलेली दिसते. मंदिर मूर्ती प्रमाणेच इतर स्थापत्यही तत्कालीन कला व स्थापत्याला उत्तम अभिव्यक्त समजली जाते. गोपुरात बांधलेली विशाल मंदिरे हे त्यांचे वैशिष्ट्य होते.

(ड) भाषा साहित्य :- या काळात संगम साहित्य निर्मिती झाली. हे साहित्य फक्त तामिळच नव्हेतर संपूर्ण भारतीय वाङ्मयाचा एक मौलिक ठेवा आहे. विपुल प्रमाणात या साहित्याची निर्मिती झाली आहे. तसेच या काळात तमिळ भाषा व इतर स्थानिक भाषांही मोठ्या प्रमाणात विकसित झाल्या. अनेक विद्वानांनी संगम ग्रंथातून तत्कालीन लोकजीवनाची विस्तृत मांडणी केली होती.

(ई) ललित कला :- संगम युगात ललित कलांचाही मोठ्या प्रमाणात विकास झाला. दक्षिणी अभिजात संगीत या काळात तत्कालीन राजवटींनीही सर्व चांगलेच बहरले. तसेच या काळात तत्कालीन राजवटींनीही सर्व प्रकारच्या कला प्रकारांना मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले. दक्षिणी नृत्यांचे विविध प्रकार या काळात उदयास आले. विविध तंतुवाद्य या 'मेळ' म्हणत त्यांच्या व ढोलांच्या वाद्य संगीतात

वापर केला जात होता. त्याचबरोबर चित्रकला, नाट्यकला, काव्य, गायन आदींही खूप भरभराट झाली. स्थानिक विविध जमातींनी ही या काळात आपल्या प्रादेशिक कला जोपासल्या. यामुळे ललित कलांना चांगलाच विकास झाला.

(७) वेशभूषा :- संगम कालीन लोकांची पारंपारिक वेशभूषा वैशिष्ट्यपूर्ण होती. या काळात विविध प्रकारच्या वस्त्रांना पेहराव प्रचलित होता. सुरुवातीला झाडांच्या साली व पानांची वल्कले याला वस्त्र स्वरूपात वापर केला जात होता. कालांतराने सुती, रेशीम कपड्यांचा वापर केला वापर केला जात होता. त्याकाळी पुरुष दोन वस्त्रांचा वापर करत असत. एक कमरेभोवती गुंडाळत असत व दुसरे खांद्यावर उपरणे स्वरूपात घेत असत. कलींगम कापडाचा संगम साहित्यात वारंवार उल्लेख आलेला आहे. श्रीमंत लोक तलम सुती कापड विशेषतः स्त्रिया सुरेख मलमली वस्त्र परिधान करत. सुती रेशीम कापडाचे पुरावे अनेक ठिकाणी मिळाले आहेत.

(८) अलंकार :- तमिळ त्याकाळी विविध प्रकारचे अलंकार वापरत वापरत असत. चेर, पांड्य, चोलांच्या काळात लोकांचे आर्थिक जीवन चांगल्या प्रकारचे होते. त्यावेळी सोने, चांदी, मौल्यवान खडे, मुद्रा सिक्के यांचे विविध अलंकार प्रचलित होते. विशेषतः स्त्रियांमध्ये अनेक अलंकाराची खासियत होती. तोय्यकम, तोडी, फेंजन (मुकुट) पुलुकम (बिंदी) कुळई पुकुळी, अंगठी, साखळ्या, सौभाग्याचं लेण (लिळकु) सारखे अनेक अलंकार प्रसिद्ध होते. असे म्हणत. म्हणून स्त्रिया मंगळसूत्र वापरत त्याला 'ताली' असे म्हणत. कंठमाला, तोडे, बाजुबंद, कर्णफुले इत्यादी अनेक अलंकार संगम काळात प्रचलित होते. बांगड्या, कडी, मेखले, असे विविध अलंकारही प्रसिद्ध होते.

(९) आहार :- दाक्षिणात्य संस्कृतीची विशेष ओळख असलेले पारंपरिक पदार्थ संगम काळात पाहायला मिळतात. भात हे त्यांचे मुख्य अन्न होते. तसेच मका, ज्वारी यांचाही अन्नधान्यात समावेश होता

(३३)

संगम लोक कुळगा (कुळीथ) हरभरा इत्यादी डाळींचाही अन्नपदार्थांसाठी मोठ्या प्रमाणात वापर करत होते. 'कुरुंजी' लोक ज्वारी तर मांस मटण खात असत. माशांची कढी ही देखील अनेक लोकांच्या आहारात होती. 'मुल्लई' लोक गाई म्हशी पालन करत असत. त्यांच्या आहारात दुधाचे प्रमाण जास्त होते. अनेक प्रकारच्या भाज्या नित्य आहारात होत्या. आंबा, केळी, मध, नारळापासून अनेक पदार्थ बनविले जात होते. 'नोक्कीकनाई' या काळातील प्रसिद्ध पदार्थ होता.

(१६) <u>चालीरीती-प्रथा</u> :- संगमकाळात विविध समाजगट होते. त्यांच्या चालीरीती प्रथा परंपरा वेगवेगळ्या होत्या. कुरुंजी लोकांचा शेयोन (मुरुगन) हा प्रमुख देव होता. मेयोन ही मुल्लई लोकांची, वेंदन ही मरुदम लोकांची, वरुण नेयतल लोकांची व कोरावई ही पालई लोकांची देवता होती. मातृदेवता ही देखील प्रसिद्ध देवता होती. वैदिक देवतांचीही वरिष्ठ वर्गातील लोक पूजा अर्चा करत होते. बौद्ध व जैन धर्मांचाही प्रसार होत होता. विविध प्रकारच्या पूजा पद्धतींचा अवलंब केला जात होता.

अशा प्रकारे संगमकालीन सांस्कृतिक जीवन दक्षिण भारताची अनोखी परंपरा दर्शविणारे होते.

—— x x ——

## (७) संगमकालीन प्रारंभिक राजकीय व्यवस्था :-

अनेक मोठ मोठी साम्राज्य कार्यरत होती. त्यावेळी संगमकाळात दक्षिणेत लहान-लहान राज्य अस्तित्वात होती. या काळातील चेर, पांड्य, चोळ या प्रमुख राजवटी महत्त्वाच्या होत्या. त्यांची स्वतंत्र राज्यव्यवस्था होती. केंद्रीय प्रांतिक व ग्रामीण प्रशासन व्यवस्थेची त्यांची स्वतंत्र यंत्रणा आपल्याला पाहायला मिळते.

(१) **केंद्रिय राज्यव्यवस्था** :- या काळात दक्षिणेतही पारंपारिक राजेशाही होती. त्यासोबत त्याचे मंत्रिमंडळ व अधिकारी वर्ग होता. त्याचे स्वरूप रूढ होती. साधारण भुमिके प्रमाणे होत.

(अ) **राजपद** :- या काळातील राजेशाही वंशपरंपरागत असेल अनियंत्रित स्वरूपाची होती. सर्व प्रकारची सत्ता राजाच्या हातीच केंद्रीत झालेली होती. राजा आपल्या हयातीतच आपला वारस निश्चित करत असे. त्यानुसार आपल्या ज्येष्ठ मुलाला 'युवराज' म्हणून राज्याभिषेक करत असे. राजाला 'वेंदूर' व सरदारांना 'मन्नार' म्हणत असत. चेर राज्यात मातृवंशाकडून व चोळ व पांड्य राज्यात पितृवंशाकडून वारसा चालत असे. कन्येला वारसा मिळाल्याचे उदाहरण मिळत नाही.

(ब) **राजदरबार** : राजदरबारातून राज्यकारभार चालत असे या दरबारास 'अरसवाई' किंवा 'पेरवाई' असे म्हणत. या दरबारातील कामकाजावेळी राज्यपरिवारातील मंडळी असेल राजाचे अधिकारी व राज्यातील प्रतिष्ठित ज्येष्ठांनाही सहभागी होता येत होते. राजासहित सर्वांना भोवती या सर्वांच्या बसण्याच्या विशिष्ट जागा निश्चित केलेल्या असत. युवराजास कोमहन दरबारी कामकाजाच्याही वेळा निश्चित केलेल्या असत. युवराजास 'कोमहन' व इतर पुत्रांना 'इळंगो' म्हणत.

(क) **राजाचे अधिकार - जबाबदाऱ्या** : राजा हा संपूर्ण राज्यकारभार यंत्रणेचा सर्वेसर्वा होता. प्रजारक्षण करणे, न्यायनिवाडा करणे, गुन्हेगारांना ~~शिक्षा~~ शिक्षा देणे, लोकांना सुविधा देणे

प्रशिक्षण देणे, नगराणे देणे व घेणे तसेच यशभाग्य करणे ही राजाची काम होती. आपल्या राज्यातील राज्यविषयक निर्णय घेण्याचे अंतिम अधिकार ही राजाला होते. तसेच अधिकाऱ्यांच्या नेमणुका बढत्या व बडतर्फी व देखील राजाचे अधिकार होते.

(५) मंत्रिमंडळ :- संगम काळात राजाला राज्यकारभारात मदत करण्यासाठी मंत्रिमंडळ होते. मंत्रिमंडळास 'उरनकुट्टम' तसेच 'आयमपेरुनकुळु' असे म्हणत. या मंत्रिमंडळात पुरोहित, सेनापती, राजदूत हेर आणि मंत्री यांचा समावेश होता. हेरांना 'ओरर' असे म्हणत. पुरोहिताला दरबारात आदराचे व मानाचे स्थान होते. मंत्रिमंडळ केवळ सल्लागार मंडळ होते. त्यांचा सल्ला राजाला बंधनकारक नव्हता उलट मंत्र्यांनाच राजाज्ञा पाळाव्या लागत होत्या.

(३) अधिकारी मंडळ :- संगमकाळात राजाचे अन्य अधिकारी मंडळही होते वरिष्ठ अधिकाऱ्यांना 'पेरुनरनम' तर कनिष्ठ अधिकाऱ्यांना 'ऐरुनम' किंवा 'सिरुनरम्' असे म्हणत. या अधिकारी मंडळाचे स्वरूप सभा-समिती सारखे असावे. अधिकाऱ्यांना सेवेचा मोबदला म्हणून जमिनी दिल्या जात होत्या. तसेच त्यांना सन्मानदर्शक पदव्याही दिल्या जात होत्या.

(२) प्रांतिक प्रशासन :- संगम काळात राजांनी राज्यकारभाराच्या सोयीसाठी आपल्या राज्याचे काही प्रांतामध्ये विभाजन केलेले होते. प्रांताला 'मंडलम' असे म्हणत. प्रांताच्या प्रमुखास किंवा राज्यपालास 'मंडलेश्वर' असे म्हणत. प्रांतावर मंडलेश्वर म्हणून राजपुत्राची अथवा मांडलिक राजाची नियुक्ती केली जात असे. प्रांतात शांतता व सुव्यवस्था राखणे तसेच प्रांताचे रक्षण करणे ही प्रांत प्रमुखाची जबाबदारी होती.

प्रांतांची पुन्हा अनेक विभागांत विभागणी केली होती. त्याला 'कोट्टम' किंवा 'वलनाडू' असे म्हणत या विभागाचीही पुन्हा पोटविभागणी केली होती. त्याला 'नाडू' असे म्हणत नाडूचीही पुन्हा छोट्या छोट्या विभागात विभागणी केली होती. वीस ते पंचवीस गावांच्या या विभागाला 'कुर्रम' असे म्हणत. प्रशासनाच्या सर्वात शेवटच्या घटक ग्राम किंवा गाव होता. गावाला 'तनकुरिन' असे म्हणत असत. ही रचना साधारण पुढील प्रमाणे होती:

प्रांत (राज्य) मंडलम

मंडलमचे विभाग - कोट्टम (वलनाडू)

कोट्टमचे विभाग - नाडू

नाडूचे विभाग - कुर्रम

कुर्रमचे विभाग - ग्राम किंवा तनकुर्रम

या प्रत्येक विभागाच्या प्रमुखाला प्रशासकीय कामाच्या मदतीसाठी राजाने नियुक्त केलेली नागरिकांची एक कृतिसमिती असे त्या समितीला 'नाट्टर' असे म्हणत फक्त तनकुर्रमच्या समितीला 'महासभा' या नावाने संबोधले जाई.

③ ग्राम व नगर प्रशासन :- गावच्या कारभार पाहण्यासाठी 'अवई' अथवा 'महासभा' होती. त्यात ब्राह्मण व्यक्तींचा समावेश होता. व्यापार करण्यासाठी मनरम व पोडियल' अशी दोन मंडळे होती. गावातील स्थानांना व सुव्यवस्था राखणे नसेल लोकांना सोयीसुविधा पुरविणे त्यांच्यातील विवाद सोडविणे ही सर्व कामे या ग्रामसभेत करावी लागत होती. संगमकालीन गावे स्थानिक स्वराज्याला पुरेपूर लाभ घेत होती. गावाला 'उर' असेही म्हणत मोठ्या गावाला 'पेरार' असे म्हणत. तर छोट्या गावाला 'सिरूर' असे म्हणत. जुन्या गावाला मुदूर असे म्हणत तर किनारपट्टीच्या गावाला 'पुहारवास' असे म्हणत असत. तर बंदर स्वरूपाच्या गावाला 'पट्टीनम' असे म्हणत.

संगम काळात दक्षिण भारतात प्रभावशाली राज्य निर्माण झाली त्या राज्यासाठी कार्यक्षम प्रशासन यंत्रणा उभा केली. त्यामुळेच त्यांच्या राज्यांना दिर्घकाळ स्थिरता प्राप्त झाली.

Scanned with CamScanner

(३७)

# दक्षिण भारताचा प्रारंभिक इतिहास

## (ब) अर्थव्यवस्था, शहरे, व्यापार आणि हस्तकला :-

(१) संगमकालीन अर्थव्यवस्था :- दक्षिण भारताच्या प्रारंभिक इतिहासाचा कालखंड संगम कालखंड म्हणून ओळखला जातो. या काळात चेर, पांड्य व चोल ही प्रादेशिक राज्य कार्यरत होती. संगम साहित्याच्या आधारे तत्कालीन आर्थिक जिवनाचीही माहिती मिळते. या आर्थिक जीवनामध्ये शेती, उद्योग, व्यापार, बाजारपेठा, चलनव्यवस्था, शहरे इत्यादींची माहिती घेणे महत्वाचे आहे.

(I) शेतीव्यवसाय :- शेती हा या काळातील प्रमुख व्यवसाय होता. संगमकाळातील दक्षिणेतील पाच भौगोलिक विभाग (पाचतिनई) महत्वाचे होते. त्यापैकी कुरुंजी हा पहाडी (डोंगरी) विभाग होता. येथे स्थलांतरीत डोंगर उतारावरती शेती केली जात होती. मुल्लई हा जंगली विभाग होता. शेती पशुपालन त्यांचा व्यवसाय होता. नईदल हा किनारपट्टीचा प्रदेश तर पालई हा कुरणांचा प्रदेश होता. तर मरूदम हा सुपिक शेतीचा प्रदेश होता. या ठिकाणी अन्न शेती केली जात होती. या विभागातील शेती समृद्ध होती.

(अ) शेतीचे प्रकार :- उत्पादन क्षमतेनुसार या काळातील शेतीचे मुख्य चार प्रकार होते. -(१) मेनपुलम - सुपिक जमीन - समृद्ध शेती उत्पादने

(२) पिनपुलम - कोरडवाहू जमीन - हंगामी कोरडवाहू पिके

(३) वनपुलम - खडकाळ जमीन - अत्यल्प उत्पादने

(४) उवरनिलम - क्षारपड जमीन - उत्पादन क्षमता नाही



Scanned with CamScanner

(ब) **पिके व मातीचे प्रकार** :- संगम काळातील शेतजमिनीच्या मातीचेही विविध प्रकार पाहायला मिळतात. यामध्ये गाळाची मृदा, तांबडी मृदा, काळी मृदा, जांभी मृदा व वालुकामय मृदा यांचा समावेश होता. त्यानुसार त्या-त्या भागात उत्पादने घेतली जात होती. शेती उत्पादनात भात हे मुख्य पिक होते. तसेच मका, बाजरी ऊस, नारळ, केळी, नाचणी, आंबा, कापूस, डाळ, आले, मिरी, ~~केळी~~ हळदी इत्यादी महत्त्वाची पिके घेतली जात होती.

(क) **शेती सुधारणा** :- तत्कालीन राज्यकर्त्यांनी शेतीला प्रोत्साहन दिले जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणण्यासाठी चालना दिली. माफक शेतसारा, शेतीसाठी बी-बियाणे, जलसिंचनाच्या सुविधांची तरतूद व कर्ज केली विहिरी, तलाव, नळी, धरणे, बंधारे यांची निर्मिती करण्यावर भर दिला. त्यांमुळ्या प्रकारच्या शेतीच्या माध्यमातून आपली अर्थव्यवस्था मजबूत करण्याचा प्रयत्न तत्कालीन राज्यकर्त्यांनी केला. शेती हा अर्थव्यवस्थेचा कणा होता.

(२) **उद्योग व्यवसाय** :- या काळात शेतीसोबत जोडून परंपरागत उद्योग व्यवसाय प्रचलित होते. यामध्ये सुतारकाम, गवंडीकाम (बांधकाम) कुंभारकाम, अलंकार बनविण्याचे काम, विणकरकाम, जाळे बांधणी, मासेमारी कापडनिर्मिती इत्यादी प्रमुख उद्योगांचे उल्लेख संगम वाङ्मयात पाहायला मिळतात. तसेच शस्त्रनिर्मिती, घरगुती वस्तू, शेती अवजारे हे उद्योग अर्जितावस्थेत होते. मदुराई व उरैयूर त्याकाळातील सुती कापडाच्या निर्मितीसाठीची प्रसिद्ध केंद्र होती. मोती जडजवाहीर व उंची मलमली रेशीम कापड निर्मिती हे उद्योग विशेष प्रसिद्ध होते. यामुळे संगमकालीन आर्थिक जीवन संपन्न असल्याचे स्पष्ट होते.

(३) **बाजारपेठ** :- उत्पादित मालाच्या योग्य बाजारपेठांची तरतूदही या काळात होती. बाजारालाच 'अंगडी' असे म्हणत असत. साधारण बाजार दोन वेळा भरला जात असे. सकाळच्या बाजार यांना 'नाळंगाडी' असे म्हणत तर संध्याकाळच्या बाजार यांना 'अल्लंगाडी' असे म्हणत. विविध वस्तूंनी त्याकाळी गजबजलेला असायचा. पांड्यांची राजधानी असलेल्या मदुराईच्या बाजारपेठ देश-विदेशातील व्यापारी उद्योजक व लोकांनी नेहमीच वर्दळीची बनलेली होती. चेरांची राजधानी 'वंची' हे तटबंदीयुक्त शहर होते. तटबंदीच्या बाहेरच्या भागाला

Scanned with CamScanner

(38)

पुरंजूर व आतील भागास 'अक्कुर' असे म्हणत या दोन भागांच्या मध्ये बाजारपेठ होती. तर चोलांची राजधानी कावेरीपट्टनम बंदर वजा शहर होते. ती देखील या काळातील प्रसिद्ध बाजार पेठ होती. दैनंदिन लागणाऱ्या विविध धान्य वस्तू यांची खरेदी विक्री या बाजारपेठा मधून होत होती. तत्कालीन आर्थिक जीवनात बाजारपेठ हा एक महत्वाचा घटक होता.

④ **दळणवळणाची साधने** :- व्यापार उद्योगांच्या संदर्भात दळणवळण साधने फार महत्वाची असतात. संगम काळात प्राण्यांचा वाहतुकीसाठी वापर केला जात असे. तसेच ओझी वाहून नेण्यासाठी माणसांचाही उपयोग केला जाई. बैलगाडी, घोडागाडी, टांगा ही दळणवळणाची पारंपरिक साधने होती. समुद्रावर लहान मोठ्या स्वरूपाच्या होड्यांचाही दळणवळणासाठी वापर केला जात होता. तप्पक, वेळ, कुंभ असे जहाजांचे विविध प्रकार होते.

सोम.दि. २०/४/२०२०

② **शहरे** :- संगमकाळात दक्षिणेतील चेर-पांड्य-चोल राजवंशांची जसजशी भरभराट होत होती. तसतसे विविध शहरांचाही उदय व विकास होत होता. चेरांची राजधानी वांजी, पांड्यांची राजधानी मदुराई व चोलांची राजधानी पुहार (कावेरीपट्टनम) ही प्रमुख शहरे होती. चोलांच्या राज्यातील उरयुर हे कापड व्यापारासाठी प्रसिद्ध शहर होते. पुहार देखील व्यापाराचे प्रमुख केंद्र होते. शालीमूर, मुशिरी ही देखील बंदर वजा व्यापारी शहरे होती. त्याचबरोबर पेरूर, कोरकाई ही देखील महत्वाची बंदरे होती. या काळात कपाडपूरम, ~~कोडुमु~~ कोडूमनाल महत्वाची शहरे होती. पुलई, वल्लाकराई, निलिकांत, नेत्रावती, ही प्राचीन काळातील केरळ मधील प्रसिद्ध शहरे होती. केरळातील कुडूर, कोडूमनूर ही बंदरे देखील मलबार किनारपट्टीवरील महत्वाची ठिकाणे होती.

चोलांच्या काळातील नागापट्टणम, तिरुवरूर ही देखील प्रसिद्ध केंद्रे होती. कांची हे ~~संगम कालखंडातील~~ संगम काळात सामाजिक, धार्मिक, आर्थिक दृष्टीकोनातून विशेष महत्वाचे शहर होते. ग्रामीण समाजाचे प्रमाण जास्त असल्यामुळे त्याकाळात व्यापार उद्योग व राजकारण या दृष्टीने काही मोजकीच नगरे या काळात विकसित झाली होती.

(३) व्यापार :- संगमकालीन व्यापाराचे स्वरूप पारंपारिक असे होते. या काळात जलमार्गाने व खुष्कीच्या मार्गाने व्यापार चालत होता. या काळात अंतर्गत व्यापार आणी परदेशीव्यापार असा दोन्ही प्रकारचा व्यापार चालत होता. या काळातील व्यापार हा वस्तुविनिमय पद्धतीने मोठ्या प्रमाणात चालत असे. काही बाबतीत चलनाचाही विनिमय साधन म्हणून वापर केला जात होता. व्यापार हा देखील अर्थव्यवस्थेचाच एक महत्वाचा भाग असतो.

(अ) अंतर्गत व्यापार :- या दक्षिणी राज्यांच्या स्थानिक किंवा अंतर्गत व्यापार भरभराटीला आला होता. व्यापारी तांडे किंवा काफीले यांच्या माध्यमातून व पारंपरिक साधनांच्या आधारे हा व्यापार चालत असे. दक्षिणी राज्य किनारपट्टीला लागुन असल्यामुळे त्यांच्या जलमार्गाने व्यापार मोठ्या प्रमाणात चालत होता. व्यापाऱ्यांना संरक्षणासाठी तसेच व्यापाराला चालना देण्यासाठी सैन्यांचाही उपयोग केला जात होता. या व्यापारात स्थानिक बाजारांची भूमिका महत्वाची होती. अन्नपदार्थ, शेती उत्पादने, शिकारी उत्पादने, मासेमारी उत्पादने, घरगुती उत्पादने, विविध अवजारे, शस्त्र, घरगुती वापराच्या वस्तू या विविध बाबींच्या अंतर्गत व्यापारात समावेश होता. तसेच मौल्यवान वस्तू, कापड यांचीही विक्री होत असे. बाजाराप्रमाणे गावोगावी घरोघरी जाऊनही व्यापारी वस्तूंची खरेदी विक्री जात असे.

(ब) परदेशी व्यापार :- संगमकाळात चेर-पांड्य-चोल या राज्यांतील अंतर्गत संघर्ष सतत चालू होता. तरीही त्यांच्या या काळातील परदेशाशी असणारा व्यापारही चांगल्या प्रकारे चालत होता. या काळात परदेशाशी आयात निर्यात व्यापार मोठ्या प्रमाणात कार्यरत होता. नैसर्गिक साधन संपत्तीच्या दृष्टीने ही राज्य खूपच ~~समृद्धी~~ हे समृद्ध होती. येथील उत्पादनांना परदेशात खूप मागणी होती. विशेषत: लवंग, मिरी, दालचिनी या मसाल्याच्या पदार्थांची पश्चिमी देशात मोठ्या प्रमाणात निर्यात

होत होती. हस्तीदंत, मोती, मौल्यवान रत्न, मलमलचे तलम कापड तसेच सुती व रेशीम कापडालाही परदेशात खूप मागणी होती. रोम, इजिप्त, अरब या देशांशी त्यांचा आयात निर्यात व्यापार चालत असे. शिवाय मलाया, चीन या देशांशी ही व्यापार चालत होता. संगमकालीन अनेक नाणी तिथे सापडली आहेत. पांड्यकाळात समुद्रमार्गे घोड्यांची आयात होत होती. तर मोती निर्यात होत होती.

संगम काळात परदेशी व्यापार जलमार्गाने तसाच खुष्कीच्या मार्गानेही चालत होता. देशी विदेशी व्यापारातून मिळणारे 'सीमाशुल्क' हे दक्षिणी राज्यांच्या उत्पन्नाचा प्रमुख मार्ग होता. ऑगस्टस, नीरो सारख्या रोमन सम्राटांनी संगम राज्यांशी व्यापार संबंध टिकवून ठेवले होते.

(क) **प्रमुख व्यापारी केंद्र :** चेर-पांड्य-चोल या दक्षिणी संगमकालीन राजवटींच्या काळात व्यापाराची चांगलीच भरभराट झाली होती. अनेक बंदरे व शहरे व्यापाराची प्रसिद्ध केंद्र बनली होती. चोलांच्या राज्यातील पुहार व उरैयूर सुती कापडाच्या व्यापारामुळे भरभराटीला आले होते. पांड्यांची राजधानी मदुराई मोत्यांच्या व इतर मौल्यवान वस्तूंच्या व्यापारामुळे देशविदेशात प्रसिद्ध होती. मलमल, रेशीम, हस्तीदंत व इतर वस्तूंच्या व्यापारामुळे चेर एक समृद्ध शहर म्हणून गणले जात होते. दक्षिणी राज्यांच्या सागरी किनारपट्टीवर व्यापारासाठी महत्वाची वसलेली अनेक शहरे व बंदरे या काळात प्रसिद्धीस आली होती.

दक्षिणेतील राज्यांना अंतर्गत व परदेशी व्यापार चांगला भरभराटीला आला होता. चेर, पांड्य, चोल या राज्यांनी दक्षिणेत दिर्घकाळ राज्य केले होते. सामर्थ्याच्या काळ असला तरी संगम सत्तांनी आपल्या राज्यातील व्यापार व्यवसायावर चांगलेच लक्ष केंद्रित केले होते. व्यापाराला त्यांनी नेहमीच प्रोत्साहन दिले. त्यामुळे ही राज्य नेहमीच समृद्ध राहिली.

(४) **संगमकालीन हस्तकला** :- पारंपरिक घरगुती साधनांच्या साहाय्याने घरच्या घरीच बनविलेल्या लोकोपयोगी उत्पादनांना हस्तकलाधारीत उत्पादने म्हणतात. प्राचीन काळात हा हस्तकला उद्योग सर्व देशभरच प्रचलित होता. संगमकाळातही दक्षिण भारताच्या आर्थिक जीवनात हस्तकलेचा मोठा प्रभाव होता.

(अ) **कापडनिर्मिती** :- १) चेर, पांड्य, चोळ राज्यात सुतकताई व विणणे हा अतिशय प्रसिद्ध महत्त्वाचा कुटिरउद्योग होता.

२) उरैयूर व मदुरा ही सुतीकापड बनविणारी प्रसिद्ध केंद्र होती.

३) दक्षिणेतील कसबी कारागिरांनी या काळात बनविलेल्या विविध वस्त्रांना मोठ्या प्रमाणात मागणी होती.

४) या काळात विणकरांनी हस्तव्यवसायावर बनविलेल्या सुरेख कापडा-ला जगभर मागणी होती.

५) वाफेसारखे किंवा सापाच्या कातीसारखे अत्यंत तलम नक्षीदार मलमली वस्त्र या काळात बनविली जात होती. असे संगम साहित्यात संदर्भ पाहावयास मिळतात.

(ब) **विविध वस्तू उपकरणे** :-

१) संगम काळात हस्तव्यवसायाच्या माध्यमातून विविध वस्तू उपकरणांची निर्मिती केली जात होती. सुतारकाम, चर्मउद्योग, तसेच लोहार, कुंभार, तांबट, दोरखंड बनविणारे, बांबूच्या वेताच्या वस्तू बनविणारे या सर्वांचे हस्तव्यवसाय उर्जितावस्थेत होते.

२) शेती, अवजारे, चामडी वस्तू, लोखंडी वस्तू, मातीची खापराची भांडी, विटा, घरगुती भांडी, टोपल्या दोरखंडे अशा विविध दैनंदिन वस्तू हस्तव्यवसायाच्या आधारे बनविल्या जात होत्या.

(क) **कलाकुसरीच्या वस्तू** :- १) कापड व दैनंदिन वस्तूप्रमाणेच या काळात हस्तव्यवसायाच्या आधारे आधारे अनेक कलाकुसरीच्या, सोन्याच्या मौल्यवान वस्तूही बनविल्या जात होत्या.

२) सोन्याचांदीचे विविध सुरेख अलंकार, आखीव रेखीव मूर्ती हस्तिदंत-मोत्यांचे कलात्मक दागिने तसेच सुंदर भावपूर्ण वस्त्र इत्यादींची

Scanned with CamScanner

निर्मिती करणारे व्यवसाय संगम काळात प्रचलित होते.

(२) हस्तव्यवसायातून बनविलेल्या वस्तूंची वस्तुविनिमय पद्धतीने देवाण-घेवाण केली जात होती.

थोडक्यात, भारताच्या प्रारंभिक इतिहासात दक्षिण भारताच्या संगमकालीन इतिहासाला महत्त्वाचे स्थान आहे. संगमकालीन इतिहासाने भारतीय संस्कृतीत मोलाचे योगदान दिले आहे. सागर किनारपट्टीतील प्रदेशात दीर्घकाळ राज्य केलेल्या चेर, पांड्य, चोल यांनी एका अनोख्या भारतीय संस्कृतीची परंपरा विकसित केली. दक्षिणेतील या आरंभ-कालीन राज्यांनी भारतीय इतिहासात खऱ्या अर्थाने समृद्ध बनविण्यात मोलाचे योगदान दिले.